**फौ.ख.क. १९५२५/२०१८**
महाराष्ट्र शासन वि. संकल्प सतीषलाल

## निकालपत्र

आरोपीस आजरोजी न्यायालयामध्ये हजर करण्यात आले. आरोपीविरुद्ध ठेवण्यात आलेल्या दोषारोपांचा सारांश आरोपीस वाचून दाखविला व समजावून सांगितला. आरोपीने त्याचे विरुद्धचा दोषारोप त्यास मान्य व कबुल असल्याचे सांगितले. आरोपीकडे तोंडी चौकशी केली असता तो स्वखुशीने गुन्हा कबुल करीत असल्याचे दिसून आले. आरोपीने त्याचेवर संपुर्ण कुटुंब अवलंबुन असल्याचे सांगितले व दया दाखवून कमीत कमी शिक्षा देणेबाबत विनंती केली. गुन्हयाचे स्वरुप तसेच आरोपीवर त्याचे कुटुंबाची असणारी जबाबदारी या सर्वाचा विचार करून मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. आरोपी फौजदारी प्रकिया संहितेचे कलम २५२ अन्वये सिगारेट व तंबाखू जन्य पदार्थ कायदा कलम ४ व २१ प्रमाणेच्या गुन्हयासाठी दोषी ठरविण्यात येत आहे.

२. आरोपीस रक्कम रु. **२००/—** दंडीत करण्यात येत आहे. आरोपीने दंडाची रक्कम न भरल्यास त्यास १ दिवसाची साध्या कैदेची शिक्षा भोगावी लागेल.

पुणे
दिनांक १६/०२/२०१८

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
कोर्ट नं. ६, पुणे.